# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 30/06/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

### रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. खापा :– अंतर्गत ०७ कि.मी अंतरावरील खैरी पंजाब नाला येथे दिनांक २९/०६/२०२३ चे १७/०० वा. दरम्यान फिर्यादी यांना गोपनीय मुखबिरव्दारे खबर मिळाली की, काही इसम ट्रकव्दारे खैरी नाला येथे रेतीची चोरी करीत असल्याचे माहीती वरून पोलीस स्टेशन खापा येथील स्टाफ हे खैरी नाला येथे गेले असता तेथे दोन ट्रक दिसले पोलीसांना पाहुन त्यापैकी एक ट्रक चालक रेती खाली करून पळून गेला दुसऱ्या निळया रंगाचा ट्रक क्र. एम. एच.– ४०/बी.– ५६१५ हा सूध्दा रेती खाली करतांना मिळून आला. त्याला थांबण्यास सांगितले असता तो थांबला ट्रक चालकास नाव विचारले असता आपले नाव **१) सूरेन्द्र भोशरावजी कापसे, वय ३८ वर्ष, रा. खडुका** असे सांगीतले रेती बाबत विचारणा केली असता त्याने सांगीतले की पहीला ट्रक हा निलेश निळे, रा. खापा याच्या मालकीचा असून आरोपीतांकडुन अंदाजे ०६ ब्रास असून किंमती अंदाजे २०००/–रू. प्रत्येकी १२०००/–रू. १ ट्रक किंमती अंदाजे १५,००,०००/–रू. एकुण १५,१२,०००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलीस हवालदार संजय दशमवार ब. नं. ५२५ पोस्टे खापा येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, ५११ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार श्री. नारायन बोरकर पोस्टे खापा हे करीत आहे.

### शासकीय कामकाजात अळथळा निर्माण
### करून नुकसान करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत ०२ कि.मी अंतरावरील मौदा ते भंडारा रोड रबडी वाला जवळ इंडीयन पेट्रोल पंप मौदा येथे दिनांक २९/०६/२०२३ चे ११.१५ वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– सुनिलकुमार मधूकर पराते, वय ५० वर्ष, रा. मानेगाव सडक ता. लाखनी जि. भंडारा हे बस ड्रायव्हर आहे. फिर्यादी हे बस क्र. MH-13-CU-8195 दरम्यान मौदावरुन परतवाडाकडे जात असता अक्षय कोल्हे, रा. मौदा व इतर ५ लोकांनी संगनमत करुन बसच्या कंडक्टर साईडच्या प्रवासी दरवाज्यावर रॉडने एक रॉड मारला त्यामूळे दरवाज्याचे काच फुटुन अंदाजे १०००/–रुपयाचे नूकसान झाले व फिर्यादीचे मित्र हितेश तागडे यांचे सोबत वादविवाद करुन फिर्यादी यांची बस अडवुन तोडफोड करुन सरकारी कामात अडथळा निर्माण करुन बसचे लोखंडी रॉडने काच फोडून कंडक्टर व फिर्यादी यांना शिवीगाळ करुन धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीतांविरुध्द कलम ३५३, ३४१, ४२७, १४३, १४७, १४८, १४९, ५०४, ५०६ भादंवी. ३ सार्वजनिक संपती नूकसान प्रति. अधि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. सोनेकर मो. क्र. ८९७५९२१७७० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर